वाचा -१) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -२०१८/प्र.क्र.१३/ मातंक दिनांक २२ फेब्रुवारी २०१९.

२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख यांचे कार्यालयाकडील परिपत्रक क्रमांक नागरी भूमापन- ३/ सनद फी आकारणी /प्र.क्र .१३८/२० दिनांक १२/११/२०२०.

३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : रा.भू.अ.२०१९/प्र.क्र.१६०/ ल-१ दिनांक २४ जानेवारी २०२२.

क्र./गावठाण/ Virtual Account/सनद फी/कावि ५७
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख
(म .राज्य) ,पुणे यांचे कार्यालय
पुणे दिनांक - २५/०३/२०२२

परिपत्रक

विषय - गावठाण जमाबंदी प्रकल्प - स्वामित्व योजनेअंतर्गत सनद फी रक्कम जमा करणेबाबत.

महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत असलेल्या गावठाण जमाबंदी प्रकल्पाअंतर्गत गावठाणातील मिळकतींचे भूमापन करून सनद व मिळकत पत्रिका स्वरुपात अभिलेख तयार करणे व जनतेस देणे अपेक्षित आहे. उपरोक्त वाचा क्रमांक १ चे शासन निर्णयामध्ये सदर योजनेवरील खर्चाबाबत व सनद फी वसुलीबाबत खालील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"भूमि अभिलेख कार्यालयासाठी मंजूर झालेला निधि महाभूमी बँक खात्यात/ स्वतंत्र खात्यात ठेवण्याची अनुमती देण्यात येत आहे.महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार अनुज्ञेय सनद फी जनतेकडून वसूल केल्यानंतर ती वरील खात्यात जमा करून पुन्हा त्याच कामासाठी भूमी अभिलेख कार्यालयास वापरण्याची अनुमती देण्यात आलेली आहे."

उपरोक्त वाचा क्रमांक २ अन्वये, सनद फी कशी आकारण्यात यावी याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.तसेच उपरोक्त वाचा क्रमांक ३ अन्वये,गावठाण जमाबंदी प्रकल्पा अंतर्गत गावठाणातील मिळकतींचे भूमापन करून तयार झालेल्या सनदेची वसूल झालेली फी ची रक्कम गावनिहाय व्हर्च्युअल अकाऊंट सह बँक ऑफ बडोदा मध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्यानुसार बँक ऑफ बडोदा शाखा पुणे स्टेशन रोड (**IFSC – BARB0STAPOO**) (बी ए आर बी झीरो एस टी ए पी ओ ओ) येथे Depositary account उघडण्यात आले आहे त्याचा खाते क्रमांक **04520100018227** हा आहे.

स्वामित्व योजनेअंतर्गत जमा झालेली सनद फी सर्व उप अधीक्षक भूमी अभिलेख यांनी बँक ऑफ बडोदा शाखा पुणे स्टेशन रोड येथे व्हर्च्युअली जमा करणेकामी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१.ज्या गावांचे गावठाण भूमापनाचे काम पूर्ण झाले आहे ,अश्या गावातील मिळकत पत्रिका व सनदा डिजिटल स्वाक्षरी झाल्यानंतरच अशी गावे नियमानुसार परिरक्षणास घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२.सनद फी ची आकारणी करतांना वाचा क्रमांक २ मधील परिपत्रकातील सूचनांचा अवलंब करून सनद फी आकारण्यात यावी.

३.सनद फी व्हर्च्युअली जमा करण्यासाठी प्रत्येक गावास VAN (Virtual Account Number) देण्यात आलेला आहे .त्याचा तपशील सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आहे (प्रत संलग्न),यादी मधील VAN नंबर, सनद फी बँक खात्यात जमा करणेस वापरण्यात यावा.

४.सनद फी प्रचलित नियमाप्रमाणे शासकीय पावती देवून वसूल करावयाची आहे व वसूल झालेली रक्कम त्या गावाच्या व्हर्च्युअल अकाऊंट मध्ये बँक ऑफ बडोदा शाखा पुणे स्टेशन रोड या शाखेत त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी व्हर्च्युअली जमा करणेची आहे.

५. चलनाच्या ३ प्रती करावयाच्या आहेत.१ प्रती बँकेकडे व २ प्रती कार्यालयाने स्वत: कडे ठेवाव्यात .

६.ज्या तालुक्यामध्ये बँक ऑफ बडोदा ची शाखा नाही /नसेल त्या तालुक्यांनी वसूल झालेली सनद फी कार्यालयाच्या डी.डी.ओ. खात्यामध्ये चलनाद्वारे जमा करून घ्यावी व सदर रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये असलेल्या डी.डी.ओ.च्या खात्यामधून नेट बँकिंग (Net Banking) द्वारे बँक ऑफ बडोदा च्या शाखेत व्हर्च्युअल अकाऊंट नंबर वापरून भरण्यात यावी .त्यासाठी व्हर्च्युअल अकाऊंट नंबर हा बँक खाते नंबर म्हणून वापरावा व **IFSC** कोड बँक ऑफ बडोदा शाखा, पुणे स्टेशन रोड **BARB0STAPOO** (बी ए आर बी झीरो एस टी ए पी ओ ओ) हा वापरावा.

७.चलनाने सनद फी जमा करत असतांना काही अडचणी आल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

1.S.Saravanan (Chief Manager -MRK) - **8411806940**

2.K.Akulwar (Manager BOB) - **9226739275**

3.Arundas Bairagi (Desk Officer Gaothan) - 7020871649

८.सनद फी गोळा करणे ,वसूल झालेली सनद फी ची रक्कम व्हर्च्युअल अकाऊंट मध्ये गाव निहाय भरणा करणे इत्यादीचा तपशील प्रचलित नियमाप्रमाणे गाव निहाय संधारण करणेचा आहे.

९. वसूल झालेली सनद फी बँक ऑफ बडोदा मध्ये भरण्यासाठीचा चलनाचा नमुना सोबत जोडलेला आहे. (प्रत संलग्न).

उदारणार्थ -

पुणे विभागातील पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कोंढणपुर या गावाची सनद फी प्रचलित नियमाप्रमाणे आज रक्कम रुपये 1000/- परिरक्षण भूमापक यांनी वसूल केलेली आहे.सदरची रक्कम चलनाद्वारे बँक ऑफ बडोदा शाखा पुणे स्टेशन रोड येथिल Depositary account क्रमांक **04520100018227** मध्ये कोंढणपुर या गावाच्या व्हर्च्युअल अकाऊंट नंबर GSPZPUNHAV**556286** मधून दुसरे दिवशी रक्कम रुपये 1000/- रोखीने व्हर्च्युअली त्यांच्या कार्यालयाच्या जवळच्या बँक ऑफ बडोदा च्या शाखेमध्ये भरणा करण्यात यावी .अशी प्रत्येक दिवसाची प्रत्येक गावाची सनद फी त्या - त्या गावांच्या व्हर्च्युअल अकाऊंट मध्ये जमा करण्यात यावी.

उपरोक्त परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करणेची आहे.

Signed by Niranjan K Sudhansu
Date: 29-03-2022 08:35:36
Reason: Approved

मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमी अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत - अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख,पुणे यांना महितीसाठी.

प्रत - उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) (भूमापन) (एकत्रीकरण) पुणे,यांना महितीसाठी.

प्रत - उपसंचालक भूमि अभिलेख ,पुणे /कोंकण /नाशिक /औरंगाबाद/अमरावती /नागपुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत - सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख ,यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत - सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख /नगर भूमापन अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत - सर्व विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी /गावठाण /शहर मापन यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत - मा.व्यवस्थापक ,बँक ऑफ बडोदा शाखा पुणे स्टेशन रोड यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी .

Land Record Copy - 1

बँक ऑफ बडोदा - Bank of Baroda

Branch code
012

SANAD FEE

GAOTHAN JAMABANDI PRAKALP - SVAMITVA

Date :- / /20

Virtual Account Number -

village__________

Taluka__________

District __________

Total Amount Rs.

Amount In Words Rs.-__________

Sealed & Date / /20 Authorised Signature

Branch Name __________

Depositor Name__________

Designation __________

Signature __________

Land Record Copy - 2

बँक ऑफ बडोदा - Bank of Baroda

Branch code
012

SANAD FEE

GAOTHAN JAMABANDI PRAKALP - SVAMITVA

Date :- / /20

Virtual Account Number -

village__________

Taluka__________

District __________

Total Amount Rs.

Amount In Words Rs.-__________

Sealed & Date / /20 Authorised Signature

Branch Name __________

Depositor Name__________

Designation __________

Signature __________

Bank Copy

बँक ऑफ बडोदा - Bank of Baroda

Branch code
012

SANAD FEE

GAOTHAN JAMABANDI PRAKALP - SVAMITVA

Date :- / /20

Virtual Account Number -

village__________

Taluka__________

District __________

Total Amount Rs.

Amount In Words Rs__________

Sealed & Date / /20 Authorised Signature

Branch Name **Transaction through CMS Menu**

Depositor Name __________

Designation __________

Signature __________

नोटांचा तपशिल

रोख नोट/Cash Notes	रक्कम /Amount
X 2000	
X 500	
X 200	
X 100	
X 50	
X 20	
X 10	
X 5	
नाणी/Coins	
X 10	
X 5	
X 2	
X 1	
एकूण / Total	

नोटांचा तपशिल

रोख नोट/Cash Notes	रक्कम /Amount
X 2000	
X 500	
X 200	
X 100	
X 50	
X 20	
X 10	
X 5	
नाणी/Coins	
X 10	
X 5	
X 2	
X 1	
एकूण / Total	

नोटांचा तपशिल

रोख नोट/Cash Notes	रक्कम /Amount
X 2000	
X 500	
X 200	
X 100	
X 50	
X 20	
X 10	
X 5	
नाणी/Coins	
X 10	
X 5	
X 2	
X 1	
एकूण / Total	